# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



वर्ष–२ ■ अंक–५ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ५ सप्टेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# दिवा-आगासन रस्त्याच्या कामाचा वेग वाढणार कधी?



## ४ वर्षाच्या कालावधीत फक्त ६५ टक्के काम पूर्ण!



## साधारण चार किमीचा रस्ता बांधायला इतका वेळ का? नागरिकांचा सवाल!

**दिवा:**–शहरातील दिवा-आगासन या प्रमुख रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याचे स्पष्ट होत असून मागील ४ वर्षात या रस्त्याचे केवळ ६५ टक्केच काम पूर्ण झाल्याची माहिती समोर येत आहे.जेमतेम ४ किमीचा हा रस्ता पूर्ण करण्यास होणारा विलंब येथील नागरिकांच्या जीवावर उठला असून अपघाताचे प्रमाण मागील काही महिन्यात वाढले आहे.

कोरोनामुळे सदर रस्त्याचे काम रखडल्याचा दावा पालिका प्रशासन करत असताना दुसरीकडे मात्र २०२१ मध्ये कामाची गती का वाढवण्यात आली नाही असा सवाल आता जाणकार नागरिक विचारत आहेत.

दिवा आगासन रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू राहिल्याने या रस्त्यावरील अपघात वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एकूण ३.८ किलोमीटरचा असणारा हा रस्ता बांधण्यासाठी इतका वेळ का लागतो असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी नागरिक करत आहेत.

> *जागे विषयी शेतकऱ्यांचे काही प्रश्न असल्याने काम रखडले.६५ टक्के काम पूर्ण झाले आहे.उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल!*
>
> *– अनिल पाटील, अभियंता ठाणे महापालिका*

> *स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार पणा मुळे दिवा आगासन रस्त्याचे काम रखडले.मागील ५ वर्षे हे लोकं एकच रस्ता बनवत आहेत.जर शेतकऱ्यांचे काही प्रश्न असतील तर ते इतके दिवस का सोडवले जात नाहीत. दिवावासीयांना हे लोक गृहीत धरतात.*
>
> *– रोहिदास मुंडे, अध्यक्ष भारतीय जनता पार्टी, दिवा मंडळ*

# लाडक्या बाप्पाला साश्रु नयनाने निरोप

# सुमारे ४२ हजार श्रींचे विधीवत विसर्जन

**ठाणे:** ठाणे शहरासह कल्याण,डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर या शहरी भागासह ग्रामीण भागात मोठ्या धुमधडाक्यात आगमन झालेल्या सुमारे ४२ हजार आपल्या लाडक्या बाप्पाला गणेशभक्तांनी साश्रु नयनाने गुरुवारी निरोप देताना, पुढच्या वर्षी लवकर या...अशीही भावना गणेशभक्तांनी व्यक्त केली. यामध्ये २४ सार्वजनिक तर, ४१ हजार ८९५ घरगुती गणपती बाप्पांचा समावेश आहे. तसेच पोलिसांनी चौकाचौकात विशेष बंदोबस्त तैनात ठेवला होता. तर, विसर्जन घाटावर सीसीटीव्हीद्वारे वॉच ठेवण्यात आला होता.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दुपारपासूनच विसर्जन सोहळ्यास प्रारंभ झाला. हा विसर्जन सोहळा रात्री उशिरापर्यंत सुरू होता. दोन वर्षांनी कोरोनाचा संकट सरल्याने सर्व निर्बंध दूर शासनाकडून रद्द केले. त्यामुळे आगमन आणि विसर्जनाला मिरवणुक काढून नाचत गणेशभक्तांनी आपल्या आनंद व्यक्त करताना दिसून आले. ठाणे शहरात वाहत्या पाण्यात बाप्पाच्या विसर्जनासाठी विसर्जन घाट ,कृत्रिम तलाव आणि गणेश मूर्ती स्वीकृती केंद्रही उभारण्यात आले होते. यावेळी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला. तसेच विसर्जन घाटांवर अँटीजन चाचणी केंद्रही उभारण्यात आले होते.

ठाणे शहर परिमंडळात ५ हजार १९१ घरगुती बाप्पांना साश्रु नयनाने निरोप देण्यात आला. भिवंडी परिमंडळात १ सार्वजनिक तर ३ हजार १४५ घरगुती बाप्पांचे विधीवत विसर्जन झाले. तर सर्वाधिक ०७ सार्वजनिक आणि १२ हजार ५९५ घरगुती श्रींना कल्याण परिमंडळात निरोप देण्यात आला. उल्हासनगरात २ सार्वजनिक तर ८ हजार ७०२ घरगुती, तसेच वागळे इस्टेट परिमंडळात ०७ सार्वजनिक आणि ८ हजार ५७७ घरगुती गणरायाचे विधी विसर्जन करण्यात आले. तर एकूण १७ सार्वजनिक व ३८ हजार २२८ घरगुती श्रींना निरोप देण्यात आला. तसेच ठाणे ग्रामीण भागातील ७ सार्वजनिक आणि ३ हजार ६६७ घरगुती श्रींना निरोप देण्यात आला.बाप्पाच्या निरोप सोहळ्यात लाडक्या बाप्पाला निरोप देताना गणेशभक्तांच्या डोळे अश्रूंनी पाणावले होते.

---

## लाचखोर एमएमआरडीएचा उपनियोजक गजाआड

**ठाणे: तक्रारदारांच्या ओळखीच्या दोन व्यक्तींच्या जमिनीचे झोन दाखला देण्याकरिता प्रत्येकी बारा हजारांची लाचेची मागणी करत, ती स्वीकारताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) अंतर्गत ठाणे उप प्रादेशिक कार्यालयाचे उपनियोजक शिवराज प्रकाश पवार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबीने) रंगेहात जेरबंद केले.**

दोन व्यक्तींच्या जमिनीचे झोन दाखला देण्याकरिता ३३ वर्षीय तक्रारदारांकडे प्रत्येकी १२ हजार असे एकूण २४ हजार रक्कमेची लाच मागितली होती. या प्रकरणी ठाणे एसीबीकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर ३० ऑगस्ट रोजी त्या तक्रारीची पडताळणी केली असता, संबंधित अधिकाऱ्याने लाच मगितल्याचे समोर आले. त्यानंतर ठाणे एसीबी पथकाने गुरुवारी दुपारी सापळा कारवाई करून माजीवडा येथील रहिवासी असलेले शिवराज पवार यास त्याच्याच कार्यालयात २४ हजाराची लाच स्वीकारतांना रंगेहात अटक केली. या प्रकरणी रात्री उशिरा पर्यन्त एसीबीची कारवाई सुरु होती. ही कारवाई पोलिस उपअधीक्षक प्रमोद जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय शिंदे,पोलीस हवालदार अभिजित पवार, सचिन गोसावी, जयश्री जोंधळे, पोलीस शिपाई त्रिभुवन यांनी केली.

---

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्श्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## एक कोटींहुन अधिक रुपयांची फसवणूक करणाऱ्या त्रिकुटाला अटक

### आर्थिक गुन्हे शाखेची कामगिरी

ठाणे: मत्सपालन व्यवसायाकरीता तक्रारदारांसह १३ गुंतवणुकदारांकडून ठेवी स्विकारून त्याच्यावर आकर्षक परताव्याचे अमिष दाखवत, त्यांची एक कोटींहून अधिक रुपयांची फसवणुक करणाऱ्या एका त्रिकुटाला बेड्या घालण्यात ठाणे शहर पोलीस दलाच्या आर्थिक गुन्हे शाखेला यश आले आहे. त्या त्रिकुटाला येत्या ५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. तसेच याप्रकरणात असंख्य गुंतवणुकदारांनी गुंतवणुक केली, असल्याचे तपासात पुढे आलेले आहे. त्यामुळे गुंतवणुकदारांच्या संख्येत व फसवणुक झालेल्या रकमेत खुप मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. तर,ज्या गुंतवणुकदारांनी या गुन्हयात उघडकीस आलेल्या दोन कंपन्याच्या गुंतवणुक योजनेमध्ये गुंतवणुक केली, त्यांनी ठाणे शहर आर्थिक गुन्हे शाखा येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

अटक केलेल्या त्रिकुटामधील कल्याण,खडकपाडा सर्कल येथील अजय कृपाशंकर श्रीबस्तक (३५), तर कल्याण पत्री पुलाजवळील सलिम चांद सय्यद (४३) आणि कल्याण, मुरबाड रोडवरील मोहमद रजा याकुब खान (३४) यांच्यासह फरार असलेल्या उल्हासनगर नंबर ५ मधील इशाक जुम्मन अन्सारी या चौकडीने ऋडखझ ऊछए-च् खछअख- ड्डझ ऋडखझ ऊछए-च् खछअख- -टण- ड्डझ या कंपनीच्या स्थापना करत, त्याद्वारे गुंतवणुकदारांना ती चौकडी मत्सपालनाचा व्यवसाय करतात, १ लाख रूपये १२ महिन्यासाठी गुंतवणुक केल्यास १८ हजार रूपये दरमहा परतावा व मुद्दल रक्कम, १ लाख रूपये १८ महिन्याकरीता गुंतवणुक केल्यावर प्रत्येक १ महिन्यानंतर ११ हजार ११२ रूपये परतावा व मुद्दल रक्कम तसेच BIO-FLOC स्किममध्ये २ लाख रूपये २ वर्षाकरीता गुंतवणुक केल्यास एकुण ५ लाख ५६ हजार रूपये परतावा व मुद्दल रक्कम तसेच १२ व १८ महिन्यांकरीता ठराविक रक्कम गुंतविल्यास तसेच जसे जसे गुंतवणुकदार पिरॅमिडप्रमाणे वाढत जाईल अशा प्रत्येक ठराविक टप्प्यावर गुंतवणुकदार यांना मोबाईल, लॅपटॉप, फॉरेन ट्रिप, बुलेट, मारुती कार, लक्झरीयस कार, १ बीएचके फ्लॅट, २ बीएचके फ्लॅट, बंगलो, ५० लाख कॅश, १ कोटी रॉयल्टी अशा अशक्यप्राय गुंतवणुक योजनेची माहिती देत, फिर्यादी व १३ गुंतवणुकदारांना प्रोत्साहित करून त्यांचा विश्वास संपादन करून तक्रारदारांकडून ५ लाख २० हजार रूपयांची व १३ गुंतवणुकदारांची मिळून एकुण १ कोटी सात लाख १५ हजार रुपये ठेवी स्वरूपात स्विकारून ती रक्कम व परतावा परत न देता त्यांची आर्थिक फसवणुक करून अपहार केला. याप्रकरणी त्या चौकडीविरोधात महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन भादवी कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबधाचे संरक्षण करण्याचा अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात अजय श्रीबस्तक , सलिम चांद सय्यद आणि मोहमद रजा याकुब खान या तिघांना ३० ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केल्यावर त्यांना येत्या ५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

ही कामगिरी ठाणे शहर पोलीस दलाचे सह पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त सुनिल लोखंडे व सहायक पोलीस आयुक्त अरविंद वाढणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे शहर आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिशचंद्र राठोड यांच्या पथकाने केली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# सांघिक यशाने कोरोनाच्या संकटावर मात

## ठाणेकरांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा उत्साहात उत्सव साजरा करा

## ठामपा आयुक्त डॉ विपीन शर्मा





ठाणे : ठाणे महापालिका अधिकारी आणि कर्मचारी ठामपणे उभे राहिल्याने कोरोना सारख्या संकटावर मात करणे शक्य झाले हे सांघिक यश आहे, असे गौरवोद्गार प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी बुधवारी काढले. डॉ. शर्मा यांनी सपत्नीक महापालिकेच्या कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली.

यंदा कोरोनाचे संकट तुलनेने निवळलेले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सगळ्यांना जोशात गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. त्याच प्रमाणे महापालिका कर्मचाऱ्यांनीही पालिकेतील हा उत्सव आनंदात आणि उत्साहात साजरा करावा. तसेच, ठाणेकरांनीही निर्बंधमुक्त सण साजरा करावा, असे आवाहन डॉ. शर्मा यांनी केले. ठाणेकरांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा त्यांनी दिल्या.

ठाणे महापालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे ४०वे वर्ष आहे. मंडळाचे अध्यक्ष, महापालिका आयुक्त यांच्या हस्ते गणेशपूजन झाले. त्यानंतर, मंडळाचे उपाध्यक्ष आणि अतिरिक्त आयुक्त (२) संजय हरवाडे यांच्या हस्ते डॉ. शर्मा यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी, उपाध्यक्ष आणि उपायुक्त प्रशांत रोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, मंडळाचे उपाध्यक्ष आणि सहायक आयुक्त महेश आहेर, माहिती आणि जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, मंडळाचे सचिव पी. एच. पाटील, कार्यवाह आर. के. पाटील आदी उपस्थित होते.

# 'त्या' तरुणाच्या कुटुंबियांना दहा लाखांची आर्थिक मदत करावी

## काँग्रेसची मागणी

**ठाणे:** येथील कोपरी पूल येथे २६ ऑगस्ट रोजी सकाळी साधारण साडेनऊच्या सुमारास दुचाकीने मुंबई येथे जात असताना, कोपरी पुलावर पडलेले खड्डे व प्रचंड वाहतूक कोंडीमुळे धीम्या गतीने चालणाऱ्या अवजड वाहनांच्या गर्दीतून मार्गक्रमण करताना, वागळे इस्टेट येथील विनीत भालेराव या तरुणाचा ट्रेलरखाली सापडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेतीळ मृत तरुणाच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १० लाखांची आर्थिक मदत करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी राहुल पिंगळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ठाण्यात एसी युनीटला आग; कॉस्मेटिक वस्तू जळाल्या

*__ठाणे:__ येथील मानपाडा, टिकुजीनी वाडी रोड येथील कोठारी कंपाउंड, २७ एकर, येथे सुमारे २००० चौरस फुटांच्या गाळा क्रमांक १ मधील एसी इनडोअर युनिटला आग लागल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री एक वाजून ४८ मिनिटांनी आग लागली. या आगीत जवळील कॉस्मेटिक वस्तू जळाल्या आहेत. या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी चितळसर पोलीस , महावितरण विद्युत विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन केंद्राचे जवान यांनी धाव घेतली. तर महावितरण विद्युत विभागाचे कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत केला. तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले. या घटनेत कोणालाही दुखापत नाही.अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.*

# दिव्यात मीटर बॉक्सला आग

**ठाणे:** दिवा,आगासन रोड येथे ओंकारेश्वर अपार्टमेंट या इमारतीच्या तळ मजल्यावरील टोरंट विद्युत कंपनीच्या मीटर बॉक्स मध्ये आग लागल्याची घटना गुरुवारी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी टोरंट विद्युत विभागाचे कर्मचारी, अग्निशमन केंद्राचे जवान यांनी धाव घेत, टोरंट विद्युत विभागाचे कर्मचाऱ्यांनी तत्काळ विद्युत पुरवठा खंडीत केला. तर अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# हद्दपार गुंडाला अटक

**ठाणे:** ठाण्यासह मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, पालघर आणि रायगड या पाच जिल्हयातून दोन वर्षांसाठी हद्दपार केलेल्या तिरूपती उर्फ अथर्व जिवनराव मुडंकर (२४) याला जेरबंद केल्याची माहिती कासारवडवली पोलिसांनी गुरुवारी दिली. तिरुपती याच्यावर अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने त्याला ठाण्यासह पाच जिल्हयातून स्थानबद्द करण्याचे आदेश वागळे इस्टेट परिमंडळाचे पोलीस



उपायुक्त डॉ. विनय राठोड यांनी २१ एप्रिल २०२२ रोजी दिले होते. तरीही तो कासारवडवली परिसरात पोलीस उपायुक्तांच्या परवानगीशिवाय, मोकाट फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, त्याला ३१ ऑगस्ट रोजी ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार कारवाई करण्यात आली. पोलीस हवालदार संतोष चव्हाण हे याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.



**माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील**
यांच्या दिवा विकास प्रतिष्ठानच्या
गणरायाची सुबक मूर्ती!



**रमेश जाधव यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराय!**
हरिश्चंद्र अपार्टमेंट, डी विंग, तिसरा माळा, गुरुदर्शन नगर, दिवा



**बालादा ग्रुपचा राजा!**
रिलायन्स टॉवर, मुंब्रा देवी कॉलनी, दिवा (पूर्व) प्रियश धाडवे, प्रथमेश जाधव, मार्मिक खडके, मयूर मजगर



**नरेंद्र बुनकर यांच्या घरी विराजमान झालेले गणराय!**
आदर्श अपार्टमेंट, मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)



**शिवतेज मित्र मंडळ**
ओंमकार पॅलेस म्हात्रे गेटजवळ दिवा (पूर्व).




**ओम साई सृष्टीचा राजा**
अध्यक्ष नरेश पवार, उपाध्यक्ष यज्ञेश पवार, चिन्मय पवार, करण पोडवाल, गणेश नगर, दिवा-आगासन रोड दिवा (पूर्व)



**दिवा शिळ रोडचा राजा श्री एकरूप मित्र मंडळचा गणपती!**
अध्यक्ष सागर सूर्यवंशी
उपाध्यक्ष सिद्धेश वाडेकर
खजिनदार विनय घोणे



## श्री साई गणेश मित्र मंडळ

एस.एम.जी. शाळेजवळ,
दिवा- आगासन रोड, दिवा (पूर्व)




## वक्रतुंड सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ

अध्यक्ष रितेश मस्के, उपाध्यक्ष दत्ता सुजन, खजिनदार बालाराम साळुंखे, वक्रतुंड नगर, टाटा पावर नगर रोड, दिवा (पूर्व)




## जय मल्हार सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ

अध्यक्ष प्रल्हाद भरत म्हात्रे, उपाध्यक्ष बिभिषन भरत म्हात्रे, अजय भरत म्हात्रे, दळवी नगर, दिवा-आगासन रोड, दिवा




## जय भवानी मित्र मंडळ

जगन्नाथ धाम सोसायटी, मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)



## बाबासाहेब बॉईज मित्र मंडळचा गणपती

श्रीधर धाम अपार्टमेंट, रिलायन्स टॉवरजवळ, दिवा (पूर्व)




## मुंब्रादेवी मित्र मंडळ

ट्रान्सफॉर्मर रोड, मुंब्रा देवी कॉलनी, दिवा (पूर्व).




## उत्तर भारतीय मंडळ

अध्यक्ष मनोज गुप्ता, उपाध्यक्ष बी.के. चौरसिया, सचिव जगत चौरसिया, ओम साई अपार्टमेंट, मुंब्रादेवी कॉलनी, दिवा (पूर्व).

## उक्षी रेल्वे स्थानकावर दिवा-सावंतवाडी, तुतारी एक्स्प्रेस थांबण्यासाठी ग्रामस्थांनी घेतली उदय सामंत यांची भेट



# उद्योग मंत्री सामंत यांनी दिले केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पत्र

रत्नागिरी( एम.एम.काझी):- तालुक्यातील उक्षी रेल्वे स्थानकावर दिवा-सावंतवाडी,तुतारी एक्स्प्रेस थांबण्यासाठी ग्रामस्थांनी ना.उदयजी सामंत यांची नुकतीच भेट घेतली.आणि या स्थानकावर गाड्या थांबण्यासाठी निवेदन अर्ज ही दिला आहे.

रत्नागिरी व संगमेश्वर या दोन्ही तालुक्याची जाकादेवी,चवे,ओरी,तरवळ, आगवे, विल्ये, बोंड्ये,नार्शिंगे, राई, रानपाट, पोचरी, मेढे,मांजरे, उपळे,डावखोल, कोंड्ये, फुणगुस, उक्षी,वांद्री, देन,परचुरी, आंबेड बुद्रुक,कोळंबे, मानस्कोंड, डींगणी अशा अनेक गावातील प्रवाशांच्या फायद्याचे हे स्टेशन आहे.कोकण रेल्वे सुरू झाल्यापासून या ठिकाणी दोन्ही वेळेत जाणाऱ्या व येणाऱ्या पेसेंजर गाड्या थांबा घेत होत्या. कोरोना महामारीचे देशावर संकट आल्यावर बंद असलेली रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यात आली. त्यानंतर येणारी दिवा सावंतवाडी व मुंबई कडे जाणारी या गाडीचा थांबा रद्द करण्यात आला.

या गाड्या पुन्हा थांबण्यासाठी रिक्षा चालक व मालक संघटनेचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ यांनी उद्योग मंत्री उदयजी सामंत यांची भेट घेऊन समस्येची कल्पना दिली.याची दखल घेत उद्योग मंत्री उदय जी सामंत यांनी त्वरित केंद्रीय रेल्वे मंत्री यांना तसे पत्र ही दिले आहे.

यावेळी उक्षी गावचे माजी सरपंच मिलिंद खानविलकर,उपसरपंच हरिश्चंद्र बंडबे,पांडुरंग पाताडे,ओमकार घडशी,सुशांत मेस्त्री,सुरेंद्र देसाई,संदीप सापटे,संभाजी दुदम इत्यादी रिक्षा चालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# गडकिल्ले वाचवण्यासाठी सोमेश्वरमधील तरुणाची देखाव्यातून साद

**रत्नागिरी:- गडकिल्ल्यांचे जतन व्हावे यासाठी अनेक संस्थांनी पुढाकार घेतला असताना आता सोमेश्वर मधील तरुणाने गणेशोत्सव देखाव्यातून गडकिल्ले संवर्धनाचा संदेश दिला आहे. पावनखिंड सिनेमा पाहिल्यानंतर प्रेरणा घेत हा देखावा साकारल्याची प्रतिक्रिया सोमेश्वर येथील मयूर भितळे या तरुणाने दिली.**



मयूर भीतळे हा रत्नागिरीतील सोमेश्वर येथील रहिवासी आहे. मागील चार वर्षे हा तरुण गणपतीला देखावा साकारत आहे. मात्र, यावर्षी मयूरने साकारलेला देखावा लक्षवेधी ठरत आहे. यावर्षी मयूरने देखाव्यातून गडकिल्ले बचाव करण्याचा संदेश दिला आहे.

यावर्षीच्या देखाव्यात मयूरने पावनखिंड आणि विशाळगडची प्रतिकृती उभारली आहे . ज्या दिवशी पावनखिंड चित्रपट पाहिला त्या दिवशी बाजीप्रभू हृदयामध्ये भरले आणि त्याच दिवशी हा देखावा गणेशोत्सवात साकारण्याचा निश्चय केल्याचे मयूर याने सांगितले. स्वराज्याच्या राजांना सुखरूप विशालगडापर्यंत पोहोचवण्याचा विडा उचलून घोडखिंडीला पावनखिंड बनवणाऱ्या महायुद्धाला मानाचा मुजरा या देखाव्याच्या माध्यमातून देण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे मयूर याने सांगितले.

महाराजांचे किल्ले ही स्वराज्याची आठवण आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांनी जीवाची बाजी लावत हे किल्ले स्वराज्यात आणले. या किल्ल्याचे पावित्र्य जपण्याचे काम प्रत्येकाचे आहे असा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. स्वराज्याचे किल्ले सुरक्षित रहावे व पुढील अनेक पिढ्यांना महाराजांचे कार्य माहिती व्हावेत यासाठी हे किल्ले सुरक्षित राहणे गरजेचे आहे. मयूर याने पावनखिंडच्या बाजूला किल्ले विशालगड हा किल्ला बनवला आहे. आज विशाल गडावर अनेक ठिकाणी अस्वछता आहे. किल्ल्यावर घाणीचे खूप साम्राज्य आहे. विशालगडावरील कचऱ्याचे साम्राज्य कमी झाले पाहिजे. विशालगडासह महाराजांच्या प्रत्येक किल्ल्यावर स्वच्छता राखली पाहिजे असा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. हा देखावा साकारताना मयूरला अभिजीत आलीम याने मदत केली.



# शिरगाव- उद्यमनगरात कचऱ्याच्या दुर्गंधीचे साम्राज्य

**रत्नागिरी:-**शहराला लागून असलेल्या शिरगाव ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत येत असलेल्या चंपक मैदान नजिकच्या भागात सध्या कचर्याच्या दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे परिसरातून ये-जा करणारे नागरिक तसेच गणपतीपुळेसह मिर्या, आरे-वारे समुद्र किनारी जाणार्या पर्यटकांना प्रचंड दुर्गंधीतून प्रवास करावा लागत आहे. यामुळे ग्रामपंचायत प्रशासन नेमके या परिसराकडे कोणत्या कारणाने दुर्लक्ष करीत आहे? असा सवाल सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे.

या भागातील प्रशासकीय कामे वेळेमध्ये होत असल्याचे बोलले जात आहे. मात्र उद्यमनगर येथील चंपक मैदानासमोरील रस्त्याला डम्पिंग ग्राउंडचे स्वरूप दिसून येत असल्याने ग्रामस्थांसह पर्यटकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. सदरच्या भागामध्ये कचरा उचलणारी गाडी येते की नाही? असा प्रश्नही या भागातून ये-जा करणार्या पादचारी, पर्यटक वाहनधारकांना पडत आहे. या रस्त्यावरून जाता-येता असे दिसून येते की, औद्योगिक वसाहतीच्या बाहेर निम्म्याहून जास्त रस्ता हा कचर्याने भरून गेला असल्याचे दिसत आहे. कोरोनाचे प्रमाण काहीअंशी कमी होत असतानाच इतर साथीच्या रोगांनी डोके वर काढले असताना शिरगाव ग्रामपंचायतीचे प्रशासन असे का वागत आहे? अशीही विचारणा ग्रामस्थांमध्ये होत आहे. या भागात श्वसनाचे विकार, मलेरिया, डेंग्युसारखी रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पी एम किसान ए- केवायसी मुदत पुन्हा वाढवली

**रत्नागिरी** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्नीकरण करा तसेच योजनेचे ए-घधउ करण्याचे आवाहन तहसीलदार रत्नागिरी यांनी केले आहे. रत्नागिरी तालुक्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे आपल्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्यामध्ये अनुदान वितरीत होण्यासाठी लवकरच प्रारंभ होणार आहे. याशिवाय सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट २०२२ पासुन योजनेच्या पुढील लाभाचे हफ्ते निरंतर मिळविण्याकरीता E-KYC ची प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. या निधी योजना अंतर्गत रत्नागिरी तालुक्यातील २९ हजार ६५१ लाथार्थ्यांपैकी १४ हजार ४२६ लाभार्थ्यांचे ए-घधउ प्रमाणिकरण पुर्ण झाले असून उर्वरित १५,२२५ लाभार्थ्यांचे ए-घधउ प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे ०३ सप्टेंबर २०२२ ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२२ रोजी शासकिय व स्थानिक सुट्टीच्या दिवशी रत्नागिरी तालुक्यातील सर्व ग्राहक सेवा केंद्र (CSC), जिल्हा सेतू कार्यालय, जयस्तंभ, रत्नागिरी व तहसील कार्यालय, रत्नागिरि येथे ए-घधउ चे कामकाज करण्यासाठी कार्यालय सुरु ठेवण्यात आलेले आहे._



# तिवरे मेढेत वर्षावास कार्यक्रम उत्साहात संपन्न

**संगमेश्वर:-**भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा तिवरे मेढे या ग्राम शाखेत वर्षावास कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला याप्रसंगी महेंद्र गमरे गुरुजी यांनी उपस्थित आणा बौद्ध धम्माचे अधिष्ठान याविषयी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ग्रामसभेचे अध्यक्ष मनोहर कांबळे होते तर ग्राम शाखेतील महिला पुरुष विद्यार्थी याने चांगला सहभाग नोंदवला होता. त्रिसरण पंचशील धम्म धम्म सदम शुद्ध परमिता आर्यसत्त अशा विविध विषयांवर गमरे गुरुजी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अनेक बौद्ध धम्मबांधव उपस्थित होते.

# वीजेचा धक्का बसून तरुणाचा मृत्यू

**खेड** :- गणपतीची सजावट करत असताना वीजेच्या अचानक लागलेल्या धक्क्याने ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील आयनी शेरी घागुर्डेवाडी येथे घडली .उपलब्ध माहिती नुसार रुपेश रघुनाथ जाधव असे त्या मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे .

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , ३० ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास रुपेश हा आई , दोन मुले , पत्नी यांच्या मदतीने राहत्या घरी गणपती सजावटीसाठी डेकोरेशन करत होता . अचानक विजेचा धक्का बसल्याने त्याचा जागीच मृत्यू ओढावला असा प्राथमिक अंदाज आहे . त्याला अधिक उपचारासाठी लोटे येथील परशुराम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते मात्र उपचार सुरू होण्यापूर्वी त्याची प्राणज्योत मालवल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले . दरम्यान याप्रकरणी येथील पोलीस स्थानकात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

# महानिर्माल्य अभियानाची तपपुर्ती

## ठाण्यात दीड दिवसाच्या विसर्जनात १० टन निर्माल्य संकलित

**ठाणे:** समर्थ भारत व्यासपीठ व ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव काळातील निर्माल्याचे संकलन करणे व त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे या अभियानाने यंदा १२ व्या वर्षात पदार्पण केले असुन यंदा दीड दिवसाच्या गणपती विसर्जनात जवळपास १० टन निर्माल्य संकलित करण्यात आले आहे. तर थर्माकोल व प्लास्टीकचा वापर ९५ टक्के कमी झालेला यावर्षी दिसून आला आहे.

कृत्रिम तलावाचा प्रयोग ठाण्याचे महाराष्ट्राला दिला, त्याचसोबत तलावांचे शहर असलेल्या ठाण्याने गणपती काळातील निर्माल्य व्यवस्थापनासाठी देखील गेल्या बारा वर्षांपासुन महानिर्माल्य व्यवस्थापन अभियान राबविले आहे. शहरातील जवळपास ७ विसर्जन घाटावर दरवर्षी सफाई सेवक व कार्यकर्त्यांच्या माध्यमातुन गणेश भक्तांकडून निर्माल्य व सजावटीचे साहित्य संकलित केले जाते. विसर्जन घाटावर तैनात करण्यात आलेल्या वाहनांमध्ये या निर्माल्याचे जैविक व अजैविक असे वर्गीकरण केले जाते. वर्गीकृत कचरा समर्थ भारत व्यासपीठाच्या संयुक्त कचरा व्यवस्थापनावर पाठवला जातो. जैविक कचऱ्यातुन खत निर्मिती केली जाते, तर अजैविक कचऱ्यात असलेल्या प्लास्टीक, कागद, पुठठा, काच, कागद सारखे घटक देखील संस्थेच्या प्रकल्प पुर्ननिर्माणमध्ये शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी पाठवले जातात.



गेल्या १२ वर्षापासुन समर्थ भारत व्यासपीठ हा उपक्रम राबवित आहे. शहरातील सफाई सेवक महिला व संस्थेचे कार्यकर्ते गणेशोत्सव अधिक पर्यावरण पुरक व्हावा यासाठी जन जागृती करत असतांनाच प्रत्यक्ष निर्माल्य संकलन व त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लागावी म्हणून एक महिना या महानिर्माल्य अभियानात कार्यरत असतात. दिड दिवसाच्या विसर्जनात जवळपास १० टन निर्माल्य संकलित करण्यात आले आहे. कोविड नंतर यंदाचा गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरा होत आहे. त्यामुळे निर्मालयाचे प्रमाण यंदा वाढले आहे. थर्माकोल व प्लास्टीकचा वापर ९५ टक्के कमी झालेला यावर्षी दिसला अशी माहिती संस्थेच्यावतीने देण्यात आली. संपुर्ण गणेशोत्सवात किमान १०० टन निर्माल्य संकलित होईल असा अंदाज संस्थेच्यावतीने व्यक्त करण्यात आला आहे. त्याचे देखील शास्त्रोक्त विल्हेवाट लावली जाईल असा निर्धार समर्थ भारत व्यासपीठाने व्यक्त केला आहे.

# अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीसंदर्भात राज्य सरकार सकारात्मक -मंगलप्रभात लोढा

### ठाण्यात राष्ट्रीय पोषण कार्यक्रमाचा शुभारंभ

**ठाणे :** स्वस्थ भारत मोहिमेत राज्यातील महिला व बालविकास विभागाच्या अंगणवाडी सेविकांचे मोठे योगदान आहे. या अंगणवाडी सेविकाचे मानधन वाढविण्यासंदर्भात राज्य शासन सकारात्मक असून लवकरच निर्णय घेईल, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी गुरुवारी ठाण्यात केले.

महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या वतीने आयोजित ५ व्या राष्ट्रीय पोषण महिना कार्यक्रमाचा राज्यस्तरीय शुभारंभ महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते व माजी महापौर नरेश म्हस्के, आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या उपस्थितीत ठाण्यातील काजूवाडी येथील महानगरपालिका शाळेत झाला. यावेळी सुमित्रा गुप्ता, उपायुक्त गोकुळ देवरे, एकात्मिक सेवा योजनेचे उपायुक्त विजय क्षीरसागर यांच्यासह लाभार्थी महिला, बालके व नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रीय पोषण महिना शुभारंभानिमित्त सकस पाककृती प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री मंगलप्रभात लोढा व सुमित्रा गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोढा यांनी अंगणवाडीतील बालकांशी व अंगणवाडी सेविकांशी संवाद साधून पोषण आहाराविषयी माहिती घेतली. गरोदर महिला व सुदृढ बालकांना सकस फ्रूट बास्केट, स्तनदा मातांना बेबी केअर किटचे वाटप मंत्री लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.



लोढा म्हणाले की, राज्यातील एक लाख १० हजार अंगणवाड्याच्या माध्यमातून राज्यातील बालके व गरोदर महिलांची काळजी घेण्याचे काम अंगणवाडी सेविका करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मूल सक्षम तर देश सक्षम असा संदेश दिला होता. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन काम करत आहे. अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीसंदर्भात विभागाने प्रस्ताव पाठवावा त्यावर मंत्रिमंडळात योग्य निर्णय घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

म्हस्के म्हणाले की, महिलांचे व बालकांचे पोषण महत्त्वाचे आहे. गरोदर महिलांना योग्य व सकस आहार दिल्यास बालकाची वाढ चांगल्या पद्धतीने होते. यासाठी महिला व बालविकास विभागाच्या अंगणवाडी सेविका अतिशय उत्कृष्ट काम करत आहेत. अनेक महत्त्वाचे उपक्रमही या विभागाच्या वतीने घेण्यात येत आहेत. अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीचा प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात यावा.

अग्रवाल यांनी प्रास्ताविकात पोषण महिना कार्यक्रमाची माहिती दिली. राज्यात १ ते ३० सप्टेंबर या काळात १ लाख १० हजार अंगणवाड्यांच्या माध्यमातून पोषण महिना उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. बालकांचे वजन तपासणे, सकस आहारासंबंधी जनजागृती करणे, महिला व बालकांचे आरोग्य, शिक्षण याविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच स्वस्थ बालक-बालिका स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती अग्रवाल यांनी यावेळी दिली. क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी पोषण शपथ घेण्यात आली. तसेच अंगणवाडी सेविकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.




नितिन चंद्रकांत दळवी.
**ओम साई कृपा चाळ, गणेश नगर,**
**दिवा-आगासन रोड दिवा**



सुरेश दादा मित्र मंडळ
**सुरेश नगरचा राजा,**
**विष्णू अपार्टमेंट, सुरेश नगर, दिवा ठाणे**



सुमित मित्र मंडळ
**सुमित अपार्टमेंट, दिवा-आगासन रोड,**
**दिवा (पूर्व)**

# कृत्रिम तलावांमधील श्रींच्या विसर्जनाला ठाणेकरांचा उत्तम प्रतिसाद

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन गुरुवारी भक्तीमय वातावरणात पार पड़ले. यावर्षी शहरातील दीड दिवसांच्या ११ हजार ६०२ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. यापैकी पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवून राज्यात पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाचा आदर्शपट घालून देणा-या ठाणे महापालिकेच्या पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्थेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश विसर्जनास भाविकांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे महापालिकेच्या गणेश मुर्ती स्वीकृत केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण ३१६ गणेश मूर्तींचेही विधिवत विसर्जन करण्यात आले.

विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गणेशमूर्ती विसर्जनासाठी ऑनलाईन टाइमस्लॉट बुकिंग सुविधा देण्यात आली होती. त्यात ४४५ नागरिकांनी बुकिंग करून प्रत्यक्षस्थळी विसर्जन केले. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने शहरात दीड दिवस, पाच दिवस, आणि सार्वजनिक गणेश विसर्जनासाठी पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेतंर्गत रायलादेवी येथे दोन, आंबेघोसाळे, उपवन पालायदेवी, निळकंठ वुड्स टिकुजीनी वाड़ी-बाळकुम रेवाळे, खारेगाव आदी ठिकाणी एकूण कृत्रिम तलावांची व्यवस्था महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. तर पारसिक रेती बंदर अणि कोलशेत बंदर याबरोबरच मिठबंदर, कळवा, गायमुख येथे विसर्जन महाघाट निर्माण केले आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मासुंदा तलाव येथील दत्तघाट येथेही पर्यायी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. त्याशिवाय मासुंदा तलावाच्या अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यालगत असलेल्या घाटावर ही गणेश मूर्ती स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



सिद्धिविनायक मित्र मंडळ
**अध्यक्ष सागर महाडिक, उपाध्यक्ष योगेश सोडा, विजय रानबागुल,**
**सिद्धी सिद्धिविनायक नगर, दिवा-आगासन रोड, दिवा (पूर्व)**



शिवसृष्टी मित्र मंडळ
**बी.आर. नगर. आकांक्षा हॉल,**
**दिवा (पूर्व )**

# ठाण्यात कृत्रिम तलावात बुडून सात वर्षीय बालकाचा मृत्यू

**ठाणे:** येथील आंबेघोसाळे तलाव येथे गणपती विसर्जनासाठी तयार केलेल्या कृत्रीम तलावात राबोडी अपना नगर,गल्ली क्र. ०१ मधील जैहद अजहर शेख या ७ वर्षीय बालकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

जैहद हा कृत्रिम तलावातील पाण्यात पोहण्यासाठी उतरला असता, पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला असावा असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पुढील कार्यवाहीसाठी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय, येथे पाठविण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी राबोडी पोलिसांनी धाव घेतली होती.अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.